**दिन विशेष...**

१८३२ : बाळशास्त्री जांभेकरांनी मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरु केले.
१८५२ : फ्रेंच अंधशिक्षक व ब्रेल लिपीचे जनक ब्रेल लुई यांचा स्मृतिदिन.
१८६८ : संतकवी दासगणू यांचा जन्म.
१९२४ : बॅ.सावरकर यांची अंदमानच्या तुरुंगातून सुटका झाली.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८५,४३९.६२ -३२२.३९(०.३८%)
डॉलर ₹ ९०.२३

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १३ |
| दिल्ली | १७ | ०९ |
| मुंबई | ३४ | २० |
| नागपूर | २७ | १० |
| पुणे | २९ | १२ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ५८ | किंमत : ५ रु. | पाने ४




बाळशास्त्री जांभेकर यांचे मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरु

**सुविचार**

आयुष्य छोटं आहे, पण त्याला अर्थपूर्ण बनवणं तुमच्या हातात आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०६ संध्या-६:०१

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४०,०१५/- २,४८,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# ऐन निवडणुकीत एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरे यांना जबर धक्का

## महत्त्वाचे मोहरे फोडल्याने राजकीय समीकरणे बदलणार?

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील २९ महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजकीय हालचालींना वेग दिला असून, ऐन निवडणुकीत त्यांनी मोठा डाव टाकला आहे. मुंबईत शिवसेना–भाजप युती असली तरी नवी मुंबईत दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे नवी मुंबईत शिंदेंसमोर थेट भाजपचे तगडे आव्हान उभे आहे.**



अशा परिस्थितीत नवी मुंबईतील राजकीय वातावरण तापले असतानाच एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गट, मनसे, भाजप तसेच काँग्रेसच्या महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांना शिवसेनेत प्रवेश देत मोठा धक्का दिला आहे. या पक्षप्रवेशामुळे नवी मुंबई आणि मुंबईतील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेरुळ विभागातील ठाकरे गट, मनसे आणि भाजपचे अनेक पदाधिकारी शिंदेंच्या शिवसेनेत दाखल झाले. तसेच धारावीतील काँग्रेस आणि मनसेच्या विविध पदाधिकाऱ्यांनीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी शिंदे यांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या..


तसेच काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष सुरेश मोगला, जयेश मुदलीयार, मुंबई युवक काँग्रेसचे महासचिव विकी व्हटकर, धारावी विधानसभा उपमुख्य समन्वयक विनायक पोळ, रोशन शेख, महेश तावरे, धारावी काँग्रेसचे दक्षिण मुंबई जिल्हा उपाध्यक्ष शिवलिंग व्हटकर यांनीही शिवसेनेत प्रवेश केला आहे. मनसेच्या विभाग सचिव सविता बोबडे, दीपक नारायणे, (पान २ वर)

### ➢ कोणाचा शिंदे गटात प्रवेश?

**नवी मुंबईतील भाजप उपाध्यक्ष राजू तिकोने, नेरुळचे महामंत्री शशिकांत मोरे, वॉर्ड अध्यक्ष भरत म्हात्रे, नेरुळ भाजप उपाध्यक्ष सोनपा घोलप, ठाकरे गटाचे माजी शाखाप्रमुख प्रतापसिंह विसाळ, माजी विभागप्रमुख सुनील हुंडारे, मनसेचे विभाग अध्यक्ष नितीन नायकडे, युवा सचिव ऋषिकेश भुजबळ, तालुका सचिव अक्षय शिरगावकर, वॉर्ड अध्यक्ष सुजित भोर, सागर जोगाडिया, आशिष कदम, गुरुदास गर्जे, अमित पवार यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.**

# नंदुरबार तालुक्यात उडणाऱ्या राखेमुळे प्रदूषण

## प्रशासनाचे दुर्लक्ष, जबाबदार कोण?





प्रतिनिधी । नंदुरबार

**तालुक्यातील आयान मल्टिट्रेड कारखान्याच्या बॉयलरमधून उडणाऱ्या राखेमुळे संपूर्ण परिसरात प्रदूषणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः कारखान्यालगत असलेल्या शिंदे गावातील ग्रामस्थ या राखेच्या सततच्या माऱ्यामुळे हैराण झाले आहेत. राखेच्या काजळीमुळे गावाचे स्वरूपच बदलून गेले आहे.**

आयान मल्टिट्रेड एलएलपी साखर कारखाना हा नेहमीच विविध कारणांमुळे चर्चेचा विषय राहिला आहे. पुष्पदंतेश्वर सहकारी साखर कारखाना अतिशय कमी किमतीत विकत घेवून आयान मल्टिट्रेड कारखाना चालवला जात आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या कारखान्यास गुपचूपपणे दिलेली भेट, ईडीचा छाप, यामुळे कारखाना चर्चेत राहिला आहे. सध्या कारखान्याच्या बॉयलर अर्थात चिमण्यांमधून उडणारी राख परिसरासाठी त्रासदायट ठरली आहे. विशेषतः शिंदे गावाला याचा अधिक त्रास होत आहे. कारखान्यातून उडणारी राख वाऱ्यामुळे शिंदे परिसरात येत असल्याने गावातील प्रत्येक घरावर, अंगणात, ओट्यावर तसेच वाहनांवर राखेचा थर साचत आहे. (पान २ वर)

## थोडक्यात

### चिनी बनावटीच्या रडारचा वेनेझुएलाला मोठा दणका

**काराकास ।** 'चीनचा माल कधीही दगा देऊ शकतो' या म्हणीचा प्रत्यय आता वेनेझुएलाला आला आहे. ३ जानेवारी रोजी अमेरिकेने राबवलेल्या 'ऑपरेशन एब्सोल्यूट रिझॉल्व्ह' दरम्यान, वेनेझुएलाने चीनकडून खरेदी केलेली प्रगत रडार यंत्रणा पूर्णपणे निकामी ठरली. यामुळे वेनेझुएलाच्या हवाई दलाला अमेरिकन विमानांची साधी भनकही लागली नाही आणि देशाला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. वेनेझुएलाने मोठ्या दिमाखात चीनकडून -१ आणि -२७ ही रडार यंत्रणा खरेदी केली होती. या रडारला जगात 'स्टेल्थ हंटर' (छुप्या विमानांना शोधणारे) म्हणून ओळखले जाते.

# बिनविरोध निवडणुकीचे निकाल राखून ठेवा!

## • मनसेची राज्य निवडणूक आयोगाला विनंती

वृत्तसंस्था । मुंबई

**ठाणे आणि राज्यात इतर महानगरपालिकांमध्ये निवडणुकांपूर्वी बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांचे निकाल राखून ठेवण्याची विनंती मनसेने राज्य निवडणूक आयोगाला केली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.**



**जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत बिनविरोध निवडून आलेल्या सर्व उमेदवारांचे निकाल स्थगित ठेवण्यात यावेत, अशी मागणी मनसेने केली आहे. पक्षाने या प्रकरणात सखोल न्यायालयीन चौकशीसाठी मुंबई उच्च न्यायालयातही धाव घेतली असल्याचे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.**

राज्यभरात १५ जानेवारी रोजी होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकांपुर्वी भाजप आणि महायुतीच्या मित्रपक्षांनी ६८ जागांवर बिनविरोध विजय मिळवला आहे. तथापि, विरोधी पक्षांनी आरोप केला आहे की सत्ताधारी पक्षांनी धमक्या आणि पैशांचा वापर करून उमेदवारांना निवडणुकीतून माघार घेण्यास भाग पाडले आहे. मनसे नेते अविनाश जाधव यांनी राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन एक निवेदन सादर केले, ज्यामध्ये ठाण्यासह राज्यभरात ६८ उमेदवार बिनविरोध निवडून येण्यास कारणीभूत ठरलेल्या घटनाक्रमाची माहिती दिली होती. तसेच, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीश आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या (पान २ वर)

# महायुतीचा धर्म पाळण्याची जबाबदारी केवळ भाजपची नव्हे : रवींद्र चव्हाण

## • राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ला सुनावले



वृत्तसंस्था । अहिल्यानगर

महायुतीचा धर्म पाळण्याची जबाबदारी एकट्या भाजपची नाही, अशा शब्दात भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) सुनावले आहे. सुरुवात 'त्यांनी' केली होती, म्हणून मला तसे बोलावे लागले, ते एक प्रकारचे प्रत्युत्तर होते, असेही समर्थन त्यांनी केले.

महापालिका निवडणुकीत भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) उमेदवारांच्या प्रचारासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष आज, सोमवारी अहिल्यानगरमध्ये आले होते. त्यांच्या उपस्थितीत युतीच्या प्रचाराचा नारळ ग्रामदैवत विशाल गणेश मंदिरामध्ये फोडण्यात आला. तत्पूर्वी रवींद्र चव्हाण बोलत होते.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार मोनिका राजळे, संघटनमंत्री विजय चौधरी, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, युतीचे समन्वयक विनायक देशमुख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत नंतर रॅली काढून दिल्ली दरवाजा भागात सभा घेण्यात आली. राष्ट्रवादीचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील प्रचार सभेत भाजपवर जोरदार हल्ला चढवला होता. अजित पवार यांना सरकारमध्ये सहभागी करून घेऊन पश्चाताप होत असल्याचे प्रत्युत्तर भाजप प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी दिले होते. (पान २ वर)

# महावितरणकडून वीज मंडळाचे खासगीकरण

## १३ मंडळांत फ्रेंचायझी नेमल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर आरोप

प्रतिनिधी । नागपूर

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीज क्षेत्राचे खासगीकरण करणार नसल्याचे आश्वासन विविध कामगार संघटनांना दिले होते. मात्र, राज्यातील महावितरणच्या १३ मंडळांतील (सर्कल्स) वीज वितरणाची जबाबदारी खासगी कंपन्यांना फ्रेंचायझी तत्त्वावर देण्यात आली आहे. हे महावितरणचे खासगीकरण असल्याचा दावा करत महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर वचनभंगाचा आरोप केला आहे. व या खासगीकरणाला विरोध दर्शविला आहे.

➢ विविध ग्राहकांकडील थकबाकी वसूल करताना होणारा राजकीय हस्तक्षेप, निवडक उद्योगांना दिलेली सवलतीची वीज व माफी असूनही महावितरण कंपनी ४७८ कोटी रुपये, महापारेषण कंपनी १५०० कोटी रुपये तर महानिर्मिती कंपनी १०० कोटी रुपयांच्या नफ्यात आहे.



त्यामुळे नफ्यात असलेल्या या कंपन्यांमध्ये खासगीकरणाची प्रक्रिया कुणाच्या फायद्यासाठी राबवली जात आहे, असा सवाल महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष मोहन शर्मा व सरचिटणीस कृष्णा भोयर यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, फ्रेंचायझीला कामगार संघटनांचा तीव्र विरोध असल्याने महावितरण, राज्य सरकार व विविध कामगार संघटनांमध्ये फ्रेंचायझीच्या मुद्द्यावर संघर्ष उभा राहण्याचे संकेत मिळत आहेत.

महावितरणने फ्रेंचायझी दिलेल्या मंडळांमध्ये जालना, छत्रपती संभाजीनगर (शहर व ग्रामीण), नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सोलापूर, धाराशिव व बीड या शहरांचा समावेश आहे. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने सांगितले की, ४ जानेवारी २०२३ रोजी वीज उद्योगातील २७ कामगार संघटनांनी पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणमध्ये कोणत्याही प्रकारचे खासगीकरण करणार नसल्याचे स्पष्ट केले होते. यावेळी वीज वितरण, पारेषण व निर्मिती या तिन्ही कंपन्यांना सक्षम करण्यासाठी आर्थिक सहाय्य केले जाईल, असेही फडणवीस यांनी सांगितले होते.

मात्र, फ्रेंचायझीच्या निर्णयामुळे फडणवीस यांनी आपल्या वचनाचा भंग केल्याचा आरोप फेडरेशनने केला आहे. फेडरेशनचे अध्यक्ष मोहन शर्मा म्हणाले की, फ्रेंचायझीचे मॉडेल महाराष्ट्राच्या वीज वितरण क्षेत्रात पूर्णतः अयशस्वी ठरले आहे. असे असतानाही खासगी भांडवलदार व कॉर्पोरेट कंपन्यांच्या हितासाठी फ्रेंचायझी कंपन्यांद्वारे खासगीकरणाचा प्रयोग करण्याचा हट्ट सुरू आहे. यापूर्वी राज्यातील तत्कालीन औरंगाबाद (आताचे छत्रपती संभाजीनगर), नागपूर व जळगाव येथील फ्रेंचायझी कंपन्या कराराची मुदत पूर्ण होण्यापूर्वीच पळून गेल्याची उदाहरणे आहेत. देशपातळीवरही ओडिशा व उत्तर प्रदेशमध्ये फ्रेंचायझी कंपन्या अपयशी ठरल्या होत्या. महावितरण शेतकरी, आदिवासी, दारिद्र्यरेषेखालील वर्ग, पावरलूम व इतर वीज ग्राहकांना सामाजिक उत्तरदायित्व निभावत सवलतीच्या दराने वीज पुरवठा करते.

# शिवशाही बस अन् दुचाकीच्या भीषण अपघातात ३ मित्रांचा अंत

वृत्तसंस्था । बुलढाणा

येथील छत्रपती संभाजीनगर महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, धाड गावाजवळ शिवशाही बस आणि दुचाकीचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. बस आणि दुचाकीची समोरासमोर जोरदार धडक बसल्याने दुचाकीवर प्रवास करणाऱ्या तीन युवकांचा जागीच मृत्यू झाला आहे.





# सरकारी नोकरीत मेरिटला प्राधान्य!

## ओपन कॅटेगरीच्या जागांवर एससी, एसटी, ओबीसीचाही हक्क; सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

वृत्तसंस्था । मुंबई

**सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण आणि गुणवत्तेवर सुरू असलेल्या दीर्घकालीन वादाला सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत पूर्णविराम दिला आहे.**



आरक्षित प्रवर्गातील (SC/ST/OBC) उमेदवारांनी ओपन कॅटेगरीसाठी ठरवलेले कटऑफ गुण मिळवले असतील, तर त्यांना ओपन कॅटेगरीतील जागांवर नियुक्तीचा पूर्ण अधिकार आहे, असा स्पष्ट निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली असून, हा निकाल शेकडो उमेदवारांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

हे प्रकरण राजस्थान उच्च न्यायालयाच्या एका भरती प्रक्रियेशी संबंधित होते. राजस्थान हाय कोर्टाने काही पदांच्या भरतीदरम्यान (पान २ वर)

### ओपन म्हणजे सर्वांसाठीच : SC ची ठाम भूमिका

**राजस्थान हाय कोर्टाचा युक्तिवाद फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने १९९२ मधील इंदिरा साहनी प्रकरणाचा संदर्भ दिला. न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'ओपन' या शब्दाचा अर्थच सर्वांसाठी खुला असा आहे. ओपन कॅटेगरीतील जागा कोणत्याही विशिष्ट जात किंवा वर्गासाठी राखीव नसून, त्या सर्व पात्र उमेदवारांसाठी उपलब्ध असतात. या निर्णयामुळे सरकारी नोकऱ्यांमधील भरती प्रक्रियेत मेरिटचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. आरक्षण आणि गुणवत्तेतील समतोलाबाबत महत्त्वाचा न्यायनिवाडा समोर आला आहे.**

## संपादकीय

### बिनविरोधचा फंडा

निवडणुका हा लोकशाही प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग असला, तरी गेल्या काही वर्षांपासून निवडणुकीची ही प्रक्रिया जास्तच गुंतागुंतीची आणि शंकास्पद बनत चालली असून त्यातून विविध विषय समोर येताना दिसत आहेत. मुळात गेल्या दहा वर्षांच्या कालावधीमध्ये झालेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ईव्हीएम घोटाळा असो किंवा मतचोरीचा मुद्दा असो याबाबत चर्चा सुरू असतानाच आता महाराष्ट्रात सुरू असलेल्या महानगरपालिका निवडणुकांच्या प्रक्रियेच्या दरम्यान जो बिनविरोध निवडून येण्याचा फंडा सुरू झाला आहे त्यावरही चर्चा सुरू झाली आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू असतानाच अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी जे चित्र समोर आले ते निश्चितच धक्कादायक होते. कारण राज्यांमध्ये तब्बल १०० च्या आसपास उमेदवार बिनविरोध निवडून आले. त्यामध्ये ४४ उमेदवार हे भाजपचे, २२ उमेदवार हे शिंदे सेनेचे आहेत. कमी अधिक प्रमाणात सर्वच पक्षांचे काही उमेदवार बिनविरोध निवडून आले असले, तरी त्याचा सर्वाधिक फायदा महायुतीला झाल्याचेही दिसून येते. निवडणुकीतील निकालानंतर सत्तेवर येण्याऐवजी प्रत्यक्ष मतदान होण्यापूर्वीच अशा प्रकारे बिनविरोध निवडून येऊन सत्तेचा मार्ग सोपा करण्याचे नवे तंत्र आता आखले जात आहे की काय अशी शंका येण्यास वाव आहे. कोणतीही निवडणूक जेव्हा बिनविरोध होते तेव्हा निवडणुकीसाठी फक्त एकच उमेदवार रिंगणात शिल्लक असतो असाच त्याचा अर्थ घेतला जातो. जेव्हा कोणत्याही निवडणुकीमध्ये अंतिमतः एकच उमेदवार शिल्लक राहतो तेव्हा ज्या उमेदवारांनी माघार घेतली त्यांनी त्या माघारीची कोणती कारणे सांगितली हेसुद्धा महत्त्वाचे असते.अनेक वेळा काही उमेदवारांनी कागदपत्रांची पूर्तता व्यवस्थित केलेली नसते किंवा काही कायदेशीर अडचणीही असतात त्यामुळे त्यांचे अर्ज अवैध ठरवले जातात. तर काही वेळेला उमेदवारांवर आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रकारचा दबाव आणून त्यांना माघार घेण्यास भाग पाडले जाते. आपल्या लोकशाहीमध्ये केवळ माघार घेण्यासाठी सुद्धा निवडणूक लढवणारे उमेदवार असतात आणि त्यातूनच त्यांचा आर्थिक फायदाही होत असतो. पण कोणत्याही निवडणुकीमध्ये नेहमीच सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांचे प्रतिनिधी निवडणुकीसाठी उभे असतात. विरोधी पक्षांचे प्रतिनिधित्व करणारा उमेदवार माघार का घेतो किंवा त्याची कागदपत्रांची पूर्तता व्यवस्थित का नसते याचा विचारही या निमित्ताने होण्याची गरज आहे. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्येही गुजरातमधून भाजपाचा एक खासदार अशाच प्रकारे बिनविरोध निवडून आला होता. विधानसभा निवडणुकांमध्येही काही उमेदवारांसमोर कोणताही विरोधी उमेदवार नसल्यामुळे त्यांना बिनविरोध विजयी जाहीर केले होते. याबाबत नवीन मुद्दा समोर येताना दिसतो आहे तो म्हणजे ईव्हीएमवर जो नोटा हा पर्याय असतो तो जर पर्याय तिथे आहे तर उमेदवार बिनविरोध कसा जाहीर केला जाऊ शकतो? नोटाबाबतचे नियम किंवा कायद्याचा विचार करता जरी नोटाला मिळालेली मते इतर कोणत्याही उमेदवारापेक्षा सर्वाधिक असली, तरी दुसऱ्या क्रमांकावर मते मिळालेल्या उमेदवारालाच विजयी जाहीर केले जाते असाच नियम आहे.

# क्रीडा स्पर्धांमधून जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याचे बळ मिळते : सीईओ करनवाल

● दिव्यांग क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन; लघुउद्योगासाठीच्या निधीचे पूर्वसंमती प्रमाणपत्रांचे वितरण

प्रतिनिधी । जळगाव

**कोणताही खेळ किंवा स्पर्धा ही केवळ जिंकण्यासाठी नसून लढण्यासाठी असते. अशा क्रीडा स्पर्धांमधून जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याचे बळ मिळते. त्यामुळे स्पर्धा फक्त विजयासाठी न खेळता लढण्याची जिद्द कायम ठेवावी, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी केले.**



कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्रीडांगणावर दिव्यांग सक्षमीकरण विभागातर्फे आयोजित दिव्यांग क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन सोमवार, दि.५ रोजी पार पडले. या उद्‌घाटन सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक आर.एस. लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी.एस. अकलाडे, महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी हेमंत भदाणे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पद्मनाभ म्हस्के, समाजकल्याण अधिकारी सतीश धस, शिक्षण अधिकारी कल्पना चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्याहस्ते हिरवी झेंडी दाखवून विविध क्रीडा स्पर्धांना सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी व प्रकल्प संचालक आर.एस. लोखंडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

पुढे बोलतांना सीईओ करनवाल म्हणाल्या की, खेळ हा सांघिक भावना जोपासणारा विषय असून खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये धाडस, आत्मविश्वास व नेतृत्वगुण वाढीस लागतात. त्यामुळे अशा प्रकारच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन अत्यंत आवश्यक आहे. स्पर्धा म्हणजे केवळ जिंकणे किंवा हरणे नसून, लढण्याची ताकद निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहे. या स्पर्धेत विजेत्यांना बक्षीस देण्यात येणार असून, पराभूत स्पर्धकांनाही प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या सोबत आपल्या दालनात चहा घेत उत्साह वाढविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या ५ टक्के सेस निधीतून दिव्यांग लाभार्थ्यांना लघुउद्योगासाठी देण्यात येणाऱ्या निधीचे पूर्वसंमती प्रमाणपत्र उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

## कृत्रिम बुध्दिमत्ता आणि माध्यमेवर आज व्याख्यान

प्रतिनिधी । जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठासह महाराष्ट्रातील ९ विद्यापीठांच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातर्फे मराठी पत्रकार दिनाचे औचित्य साधून दि.६ रोजी सकाळी ११ वाजता कृत्रिम बुध्दिमत्ता (एआय) आणि माध्यमे या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा.डॉ.सदानंद मोरे तर प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार डॉ. धनंजय बिजले, प्रा.डॉ.योगेश बोराटे मार्गदर्शन करणार आहेत. सहभागी होण्याचे आवाहन कला व मानवविद्या प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.रामचंद्र भावसार, प्रा.निशा मुडे-पवार, प्रा.संजय तांबट, प्रा.सुहास पाठक, प्रा.प्रभाकर कोळेकर यांच्यासह मान्यवरांनी केले आहे.

## बालविश्व इंग्लिश स्कूलमध्ये बालिका दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । जळगाव

**येथील बालविश्व इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये 'बालिका दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थिनींचे सक्षमीकरण आणि समाजातील त्यांचे स्थान अधोरेखित करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.**



कार्यक्रमाला शाळेच्या संचालिका भारती चौधरी, उपमुख्याध्यापिका मृणालिनी कुरंभट्टी, समन्वयक श्वेता चौधरी, पल्लवी घारे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींनी सादर केलेल्या विचारप्रवर्तक भाषणांनी झाली. यावेळी मुलींनी आत्मविश्वास, शिक्षणाचे महत्त्व, स्वावलंबन आणि समान संधी या विषयांवर आपले परखड मत मांडले. आपल्या भाषणातून त्यांनी आजच्या युगात मुली कोणत्याही क्षेत्रात मागे नसल्याचा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी शाळेतील शिक्षिकांनी मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेचे महत्त्व स्पष्ट केले. 'मुलगी शिकली तर प्रगती झाली हा संदेश विविध उपक्रमांच्या माध्यमातून देण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी कथांचे वाचन, प्रश्नोत्तर सत्र आणि सर्जनशील कला सादरीकरण आदी उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती शाळा व्यवस्थापनाने दिली.

## 'माय मराठी' पुस्तकाचे विद्यार्थिनीच्या हस्ते प्रकाशन

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म.सु. पगारे लिखित 'माय मराठी' या त्यांच्या ५६ व्या पुस्तकाचे प्रकाशन प्रशाळेतील मराठी विभागाची विद्यार्थिनी चेतना शिंदे यांच्याहस्ते करण्यात आले.**



यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे, वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे उपस्थित होते. प्रा.म.सु. पगारे यांची आतापर्यंत ५५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ५६ व्या 'माय मराठी' या पुस्तकात त्यांनी मराठी भाषा आणि साहित्याचा आढावा घेतलेला आहे. या पुस्तकात मराठी भाषेच्या उगमापासून ते मराठी वाङ्मयाचे प्रकार, साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रवाह आणि या प्रवाहांमध्ये दिसणारा मानवतावाद कशा स्वरूपाचा आहे. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या विद्वान आणि प्रसिध्द व्यक्तीच्या हस्ते करण्याऐवजी माय मराठीच्या जतन आणि संवर्धनासाठी तयार होणाऱ्या पुढील पिढीतील विद्यार्थिनींच्या हस्ते आपण करावा, असे त्यांना वाटले आणि त्या संकल्पनेतून हा पुस्तक प्रकाशन सोहळा यशस्वीरीत्या झाला. पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी प्रशाळेतील डॉ. दीपक खरात, डॉ. प्रीतो सोनी, डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदाशिव, डॉ. भारती सोनवणे, नेहा लाम्हणे, पल्लवी बारी, भाग्यश्री लाखे, प्रशाळेतील प्राध्यापक वृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. आभार खेमराज पाटील यांनी व्यक्त केले.

## जिल्ह्यात दोन ते तीन दिवसांपासून वाढली थंडी

प्रतिनिधी । जळगाव

उत्तर महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढला असून जिल्ह्यातही गेल्या दोन ते तीन दिवसापासून थंडीची लाट पसरली आहे. त्यामुळे जनजीवनावरही वाढत्या थंडीचा परिणाम जाणवू लागला आहे.

## विनयभंग केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । जळगाव

तालुक्यातील एका गावात ३५ वर्षीय महिलेचा हात धरून विनयभंग केल्याची घडली. याप्रकरणी जळगाव तालुका पोलीस ठाण्यात तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.४ जानेवारी रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास फिर्यादी महिला आपल्या घराच्या जिन्याजवळ मोबाईलवर बोलत उभी होती. फोनवर बोलणे संपवून जेव्हा त्या जिना उतरत होत्या, तेव्हा त्यांच्या घरासमोरच राहणाऱ्या एका तरुणाने त्यांना पाहून डोळा मारला आणि हाताने इशारे करून आपल्याकडे बोलावले. इतक्यावरच न थांबता, त्याने फिर्यादीच्या घराच्या जिन्याजवळ येऊन त्यांचा हात पकडला आणि अश्लील चाळे करण्यास सुरुवात केली. या प्रकारानंतर पीडित महिलेने तात्काळ जळगाव तालुका पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली.

## सूक्ष्मजीवशास्त्र विभागामार्फत कनेक्टिंग मायक्रोब्स: प्रयोगशाळा ते शाळा जोड कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील के.सी.ई. सोसायटी संचलित मूळजी जेठा महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागामार्फत व ए.टी.झांबरे माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने कनेक्टिंग मायक्रोब्स : प्रयोगशाळा ते शाळा जोड कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**

या कार्यक्रमांतर्गत माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना सूक्ष्मजीव व सूक्ष्मजीवशास्त्राची ओळख करून देणे, सूक्ष्मजीवशास्त्र शेत्रातील नवनवीन संधींची माहिती देणे आणि प्रयोगशाळेला शालेय विद्यार्थ्यांशी जोडणे हा उद्देश ठेऊन व्याख्यान व प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ.संगीता चंद्रात्रे यांनी सूक्ष्मजीवांचे अद्भुत जग आणि तुम्ही या विषयावर मार्गदर्शन केले. या व्याख्यानात डॉ.चंद्रात्रे यांनी, सूक्ष्मजीव व सूक्ष्मजीवशास्त्र ह्या संकल्पना, सूक्ष्मजीवांचा इतिहास, सूक्ष्म जीवांच्या अद्भुत शक्ती, भारतीय आदी ऋषींनी केलेले संशोधनपर लेखन, सूक्ष्मजीवशास्त्राचे दैनंदिन जीवन व औद्योगिक क्षेत्रात असणारे उपयोग, भविष्यातील विविध संधी इत्यादी विषयावर सखोल मार्गदर्शन केले. शाळेतून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना विभागातील सर्व प्रयोगशाळा दाखवण्यात आल्या. प्रयोगशाळेच्या भेटीदरम्यान तृतीय वर्ष बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी जिवंत सूक्ष्मजीव, त्यांचे विलगीकरण, रंग, स्वरूप, आकार इत्यादींचे सूक्ष्मदर्शकातून अवलोकन करून दिले, विविध प्रयोगांचे व उपकरणांचे सादरीकरण केले. ह्या कार्यक्रमात शाळेतील ९२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमासाठी ए.टी.झांबरे माध्यमिक विद्यालयाच्या मुख्यध्यापिका श्रीमती प्रणिता झांबरे, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. केतन नारखेडे व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.संजय भारंबे यांचे मार्गदर्शन लाभले.

## महिला सुरक्षेवर कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**येथील मुळजी जेठा समाजशास्त्र विभाग आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त 'महिला सुरक्षा' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सं.ना. भारंबे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कला शाखेचे उपप्राचार्य प्रा.देवेंद्र इंगळे, कला शाखेचे अधिष्ठाता डॉ.भूपेंद्र केसुर आदी उपस्थित होते. कार्यशाळेचे आयोजन समाजशात्र विभाग प्रमुख डॉ.सागर बडगे व अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख प्रा.डॉ.उज्वला भिरूड यांनी केले. कार्यशाळेत मु.जे. महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या प्रा.चिन्मयी मराठे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा.गायत्री खडके यांनी केले.

## जी.एच. रायसोनी महाविद्यालयात नवनियुक्त 'स्टुडंट कौन्सिल'चा पदग्रहण सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, वक्तृत्व कौशल्य, संघभावना व जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी तसेच त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधला जावा या उद्देशाने जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, जळगाव (ऑटोनॉमस) येथे 'स्टुडंट कौन्सिल २०२५-२६' चा पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.**



कार्यक्रमाला जी.एच. रायसोनी इन्स्टिट्यूटच्या संचालिका प्रा.डॉ. प्रिती अग्रवाल, अकॅडमीक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर सर्व शाखांमधून निवड झालेल्या नवनियुक्त स्टुडंट कौन्सिल सदस्यांना त्यांच्या पदानुसार सॅश व बॅज प्रदान करून अधिकृतपणे जबाबदारी सोपवण्यात आली. यावेळी नवनियुक्त अध्यक्ष भाग्येश चौधरी व उपाध्यक्ष लोकेश तलरेजा यांनी आगामी शैक्षणिक, तांत्रिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचा थोडक्यात आढावा सादरीकरणाच्या माध्यमातून मांडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा.डॉ. प्रिती अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'स्टुडंट कौन्सिल ही केवळ पदांची रचना नसून ती विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, निर्णयक्षमता व जबाबदारीची भावना विकसित करणारी प्रभावी प्रक्रिया आहे. संघटन कौशल्य, संवादकला, वेळेचे नियोजन व टीमवर्क या गुणांचा विकास या माध्यमातून घडतो.

'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कौशल्याधारित व अनुभवात्मक शिक्षणावर भर देण्यात येत असून 'थिअरी'सोबत 'प्रॅक्टिकल नॉलेज' आवश्यक आहे. म्हणूनच रायसोनी महाविद्यालयात विविध शैक्षणिक, तांत्रिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम सातत्याने राबवले जातात. स्टुडंट कौन्सिलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा ३६० अंश सर्वांगीण विकास साधण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही त्या यावेळी म्हणाल्या.

## पान १ वरुन

### बिनविरोध निवडणुकीचे......

उच्चस्तरीय संयुक्त समितीची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. नसेने एका प्रसिद्धीपत्रकात ठाणे महानगरपालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे. यामध्ये म्हटले आहे की, मनसेसह विरोधी पक्षांच्या उमेदवारांना एकतर पैशांचे आमिष दाखवण्यात आले किंवा सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून फसव्या मार्गांनी त्यांचे उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आले. यामुळे सत्ताधारी शिंदेसेनेचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत, जो लोकशाहीसाठी एक गंभीर धक्का आहे. प्रशासकीय पूर्वग्रह, राजकीय हस्तक्षेप, आर्थिक प्रलोभने आणि पोलीस यंत्रणेचा गैरवापर यांच्यामुळे ठाण्यात शिवसेनेचे सहा उमेदवार बिनविरोध निवडून आले, ज्यामुळे प्रतिस्पर्धी उमेदवारांना आपले उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पडले. निवडणूक आयुक्तांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, तक्रारीची तपासणी करून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

### महायुतीचा धर्म पाळण्याची......

या पार्श्वभूमीवर आता राष्ट्रवादीचे इतर आमदारही भाजपबद्दल आरोप करू लागले आहेत, याकडे लक्ष वेधले असता रवींद्र चव्हाण यांनी प्रत्युत्तर दिले. महायुतीमुळे भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांवर अन्याय होतो, हे खरे आहे. पक्ष संघटनेत वर्षानुवर्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संधी मिळेल अशी अपेक्षा असते. परंतु युती-महायुतीमुळे सर्वांना बरोबरी घेऊन जाताना, पक्षाच्या कार्यकर्त्यांवर अन्याय होतो. परंतु आपण अहिल्यानगरमधील नाराज कार्यकर्त्यांची समजूत घालत आहोत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. महामंडळावरील नियुक्त्या प्रलंबित ठेवण्यामागे हेही एक प्रमुख कारण आहे. अशा अन्याय झालेल्या कार्यकर्त्यांना स्थानिक पातळीवर, राज्य पातळीवर, महामंडळावर संधी दिली जाईल, असेही आश्वासन त्यांनी दिले. अहिल्यानगरमध्ये तांत्रिक अडचणीमुळे शिवसेनेशी (शिंदे गट) युती होऊ शकली नाही. राज्यात महायुतीकडे कार्यकर्त्यांचा मोठा ओघ सुरू आहे. विरोधकांना उमेदवारीसाठी कार्यकर्तेही मिळत नाहीत. त्यामुळेच महायुतीच्या जागा अधिक प्रमाणात बिनविरोध होत आहेत, असाही दावा त्यांनी केला. केंद्रापासून स्थानिक पातळीवर एक विचाराचे सरकार असावे. नगर शहर स्मार्ट बनवण्यासाठी त्यामुळे निधी उपलब्ध होईल, असे सांगताना त्यांनी महापौर युतीचाच होईल, असाही दावा केला.

### सरकारी नोकरीत......

असा नियम लागू केला होता की, आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना ओपन कॅटेगरीतील जागांवर नियुक्त करता येणार नाही, जरी त्यांचे गुण ओपन कॅटेगरीतील उमेदवारांपेक्षा जास्त असले तरीही. हा दुहेरी लाभ ठरेल, असा युक्तिवाद राजस्थान हाय कोर्टाने केला होता.मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि ऑगस्टीन जी. मसीह यांच्या खंडपीठाने राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय चुकीचा ठरवत याचिका नामंजूर केली. 'प्रत्येक बाबतीत गुणवत्तेला सर्वोच्च स्थान दिले गेले पाहिजे,' असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### नंदुरबार तालुक्यात......

यामुळे गावातील महिलांना रोज चार वेळा घर आणि परिसर स्वच्छ करावा लागत आहे. तरीही काही वेळातच पुन्हा राख साचत असल्याने महिला प्रचंड वैतागल्या आहेत. लहान मुले, वृद्ध आणि रुग्णांच्या आरोग्यावरही या प्रदूषणाचा गंभीर परिणाम होत आहे. या प्रकरणी ग्रामस्थांनी कारखाना प्रशासन, स्थानिक प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्याचा दावा केला आहे. तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आयान मल्टिट्रेड कारखान्याशी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव सातत्याने जोडले जात असल्याने प्रशासनावर राजकीय दबाव असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात असून, त्यामुळेच कारखान्यावर कारवाई होत नसल्याची चर्चा परिसरात आहे. राखेचा फटका शेती क्षेत्रालाही बसत आहे. परिसरातील पिकांच्या पानांवर व फळांवर राख साचत असून त्यामुळे पिकांची वाढ खुंटत आहे. उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे हा प्रश्न केवळ एका गावापुरता मर्यादित न राहता संपूर्ण तालुक्याचा गंभीर प्रश्न बनत चालला आहे. या परिसरातील कापसावर बसलेल्या राखेमुळे कापूस काळा पडत असल्याने त्याला क्विंटलमागे २०० रुपयांपर्यंत कमी भाव मिळत असल्याचा दावा शेतकऱ्यांकडून केला जात आहे. तत्काळ उपाययोजना करून राखेचा प्रश्न मार्गी लावला नाही, तर आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन कारखान्यावर कठोर कारवाई करावी, तसेच ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### ऐन निवडणुकीत एकनाथ शिंदेंचा......

राजेश कुमार पारयार, धनाशेखर पारयार, सुरेश बेडगिरी यांचाही यामध्ये समावेश आहे. या पक्षप्रवेशाच्या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह खासदार नरेश म्हस्के, माजी नगरसेवक नामदेव भगत, काशीनाथ पवार तसेच धारावी आणि नवी मुंबईतील शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. ऐन निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या घडामोडींमुळे नवी मुंबईतील राजकीय समीकरणे बदलण्याची चर्चा जोर धरू लागली आहे.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# उसाच्या शेतात आढळली बिबट्याची बछडे

## किलवणपाडा परिसरातील घटना; बंदोबस्त करण्याची होतेय मागणी

प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील किलवणपाडा गावातील एका ऊसाच्या शेतात बिबट्याची दोन बछडे आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे सिध्द झाले असून त्यामुळे गावकऱ्यांसह शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातून होत आहे.**



काँग्रेसचे तालुकाध्यक्ष तथा शेतकरी जालमसिंग गावीत यांची किलवणपाडा शिवारात शेती असून गावीत हे नेहमीप्रमाणे शेतात शेतीची कामे करत असताना त्यांना ऊसाच्या मळ्यात संशयास्पद हालचाल जाणवली. त्यांनी जवळ जाऊन पाहिले तेव्हा त्यांना या ठिकाणी बिबट्याची दोन बछडे दिसून आली.

त्यानंतर त्यांनी तात्काळ ही माहिती ग्रामस्थांना दिली. या घटनेमुळे किलवणपाडा गावासह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी करावी, बिबट्याच्या पिल्लांना सुरक्षित ठिकाणी हलवावे तसेच परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी शेतकऱ्यांसह ग्रामस्थांकडून होत आहे.

### दोन कोंबड्या केल्या फस्त...

बिबट्याची बछडे आढळल्यामुळे परिसरात मादी बिबट्या किंवा नर बिबट्याचा वावर असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे गावकऱ्यांसह शेतकरी व शेतमजूरांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, शेतकरी सुरेश गावीत यांनी, रात्री बिबट्याच्या डरकाळ्या ऐकू आल्या असून दोन कोंबड्याही बिबट्याने उचलून नेल्याचे सांगितले. दरम्यान, याबाबत नवापूर वनविभागाला माहिती देण्यात आली असून वनविभागाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी करावी, बिबट्याच्या पिल्लांना सुरक्षित ठिकाणी हलवावे, तसेच परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी शेतकरी जालमसिंग गावीत व ग्रामस्थांनी केली आहे.

# रोशनी मराठेच्या कलाकृतीचा राष्ट्रीयस्तरावर प्रथम क्रमांकाने गौरव

प्रतिनिधी । नंदुरबार

**पुणे येथे आयोजित राष्ट्रीय कला उत्सव-२०२५ मध्ये नंदुरबार येथील श्रीमती हि. गो. श्रॉफ हायस्कूलची विद्यार्थिनी रोशनी मराठे हिने त्रिमितीय शिल्प कलाप्रकारात राष्ट्रीय पारितोषिक प्राप्त करत जिल्ह्याला बहुमान प्राप्त करून दिला. तिच्या या कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्याहस्ते गौरव करण्यात आला.**

पुणे येथे राष्ट्रीय कलाउत्सव २०२५ चे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. यात श्रीमती हि.गो. श्रॉफ हायस्कूल विद्यार्थिनी रोशनी सुनील मराठे हिने त्रिमितीय शिल्प या कला स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. त्रिमितीय चित्र या कलाप्रकारात रोशनीने परंपरेला विकासाचे पंख लावू या, आत्मनिर्भर भारत घडवू या या संकल्पनेवर आधारित आकर्षक मूर्ती साकारली होती. शाडू मातीच्या माध्यमातून तयार केलेल्या या कलाकृतीत तिने भारतीय परंपरा आणि आधुनिकतेचा संगम कुशलतेने साकारत प्रेक्षकांचे व परीक्षकांचे मन जिंकले. तिच्या या उत्कृष्ट कलाकृतीला राष्ट्रीयस्तरावर प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले. या कला स्पर्धेत तिने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. तिच्या माध्यमातून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. दरम्यान, श्रॉफ हायस्कूलमध्ये आयोजित गौरव कार्यक्रमात तिचा जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांच्याहस्ते व प्रमुख अतिथी डॉ. वैभव सबनीस, तालुका क्रीडा प्रमुख महेश पाटील, सार्वजनिक शिक्षण समितीचे चेअरमन ॲड.रमणलाल शाह, सचिव डॉ.योगेश देसाई, मनीष शाह, सीए. पार्थ देसाई, मुख्याध्यापिका सुषमा शाह यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. तिला कला शिक्षक महेंद्र सोमवंशी, हेमंत पाटील आणि शिवाजी माळी यांचे मार्गदर्शन लाभले.

## थोडक्यात

### वासुदेव कापडणे यांची सरचिटणीपदी नियुक्ती

**धुळे ।** रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनची बैठक नुकतीच जिल्हाध्यक्ष ॲड. दीपक शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत वासुदेव शांताराम कापडणे यांची रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनच्या जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. याप्रसंगी संघटनेचे जितेंद्र अहिरे, दिलीप साळवे, राहूल सोनकांबळे, किशोर पाटील आदी उपस्थित होते. या निवडीबद्दल कापडणे यांचे अभिनंदन होत आहे.

### गरताड येथे उद्यापासून श्रमसंस्कार शिबीर

**शिरपूर ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि शिरपूर येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शाश्वत विकासासाठी युवक-पाणलोट व्यवस्थापन आणि पडीत जमीन विकासावर विशेष भर या संकल्पनेवर आधारित हे शिबिर गरताड (ता.शिरपूर) येथील आर.सी. पटेल प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात होणार आहे. या शिबिराचे उद्घाटन बुधवार, दि.७ रोजी सकाळी ११ वाजता गरताड गावाचे सरपंच व उपसरपंच यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.हितेंद्र महाजन हे उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेचे हे शिबिर दि.७ ते १३ जानेवारी या कालावधीत होणार आहे.

### सेवानिवृत्त शिक्षिकेची मंगलपोत लांबवली

**नंदुरबार ।** पुणे येथून नंदुरबार येथे कामानिमित्त आलेल्या एका सेवानिवृत्त शिक्षिकेच्या गळ्यातून ४५ ग्रॅम वजनाची मंगलपोत लांबविल्याची घटना शहरातील शहरातील जगतापवाडी परिसरात घडली. याप्रकरणी अनोळखीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे तालुक्यातील खराडी येथील रहिवासी असलेल्या पद्मा बच्चु मलेकर या सेवानिवृत्त शिक्षिका त्यांच्या कामानिमित्त नंदुरबार येथे आल्या होत्या. त्या नंदुरबार शहरातील जगतापवाडी बाल न्यायालय परिसरातून जात असतांना एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या गळयातील एक लाख १८ हजार ५४३ रूपये किंमतीची व ४५ ग्रॅम वजनाची मंगलपोत लांबविली. या घटनेनंतर मलकेकर यांनी शहर पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली. त्यानुसार अनोळखीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# ‘ॲग्रोवर्ल्ड आदर्श शेतकरी पुरस्कारा’चा जय बलराम शेतकरी गट ठरला मानकरी

**➔ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्याहस्ते पुरस्कार देवून गौरव**

नंदूरबार । जळगाव

**ॲग्रोवर्ल्डतर्फे शहादा येथे कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग आणि सेंद्रिय शेतीचा प्रसार करणाऱ्या तळवे (ता.तळोदा) येथील जय बलराम शेतकरी गटला मानाच्या ‘ॲग्रोवर्ल्ड आदर्श शेतकरी गट-२०२६’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

शहादा येथील नवीन बस स्टँडसमोरील मैदानावर हे ॲग्रोवर्ल्ड कृषी प्रदर्शन पार पडले. या प्रदर्शनांतर्गत शनिवार, दि.३ रोजी हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या पुरस्कार सोहळ्याला नंदूरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, ॲग्रोवर्ल्डचे संचालक शैलेंद्र चव्हाण यांच्यासह कृषी क्षेत्रातील विविध कंपन्यांचे संचालक, पदाधिकारी उपस्थित होते.

जय बलराम शेतकरी गटाने केवळ पारंपारिक शेतीवर अवलंबून न राहता सेंद्रिय पद्धतीचा अवलंब करत उत्तम शेतीचे मॉडेल उभे केले आहे. विषमुक्त अन्न आणि जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी गटाने केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगी आहेत. केवळ स्वत:शेती न करता इतर शेतकऱ्यांनाही याबाबतचे प्रशिक्षण देणे आणि शेतकऱ्यांचे उत्तम संघटन करणे, या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ॲग्रोवर्ल्डच्यावतीने त्यांना ‘ॲग्रोवर्ल्ड आदर्श शेतकरी गट-२०२६’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जय बलराम शेतकरी गटाचे अध्यक्ष छोटू कलाल, प्रगतशील शेतकरी विजयराव सोनवणे, संचालक गोटू कलाल, सचिव चंद्रकांत सोनवणे, कार्यकारणी प्रमुख उमेश सोनवणे आदींना मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्याहस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र आणि पदक असे या पुरस्काराचे स्वरूप होते.



# ‘आम्हनं तुम्हनं करू नका’, ‘मतदान करणं चुकाडू नका,

**धुळ्यात मतदान जनजागृती रॅलीतील घोष वाक्यांनी शहर दणाणलं**





प्रतिनिधी । धुळे

**महापालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांच्या संकल्पनेतून शहरात मतदान जनजागृतीसाठी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. लोकशाही बळकट करण्याच्या उद्देशाने काढण्यात आलेल्या या रॅलीला महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे व प्रशासन अधिकारी विश्वंभर दासरवाड यांनी हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ केले.**

या मतदान जनजागृती रॅलीत महापालिका शिक्षण मंडळाचे सर्व कर्मचारी, समग्र शिक्षा कार्यालयातील कर्मचारी, दिव्यांग विद्यार्थी, अध्यापन करणारे विशेष शिक्षक तसेच शासकीय विद्यानिकेतन, जिजामाता कन्या विद्यालय, कमलाबाई शंकरलाल कन्या विद्यालय, न्यू सिटी हायस्कूल, सेंट अँथनी इंग्लिश स्कूल या शाळांचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, समूहप्रमुख शरद पवार, लेखापाल अरुण चौधरी, पर्यवेक्षक गणेश सूर्यवंशी, विद्यार्थी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मतदान जनजागृती रॅलीत सुमारे १२०० विद्यार्थी,१५० शिक्षक व इतर सहभागींच्या उपस्थितीमुळे रॅलीला भव्य स्वरूप प्राप्त झाले होते. ‘आम्हनं तुम्हनं करू नका’, ‘मतदान करणं चुकाडू नका,’ अशा अहिराणी भाषेतील विविध घोष वाक्यांनी परिसर दणाणून गेला होता. रॅलीदरम्यान मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, याबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून आगामी निवडणुकांमध्ये मतदारांचा सहभाग वाढण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.



# एमपीएससीच्या परीक्षेला ७०८ जण गैरहजर

प्रतिनिधी । नंदुरबार

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा शहरातील ६ केंद्रांवर घेण्यात आली. १ हजार ६१० जणांनी ही परीक्षा दिली तर ७०८ परीक्षार्थी अनुपस्थित होते.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ शहरातील श्रॉफ हायस्कुल, जी.टी.पी. कॉलेज (भाग-अ), जी.टी.पी. कॉलेज (भाग-ब), डॉ. काणे हायस्कुल, पी.के. पाटील महाविद्यालय, डी.आर. हायस्कुल या परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. परीक्षेसाठी २ हजार ३१८ परीक्षार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी १ हजार ६१० जणांनी परीक्षा दिली तर ७०८ परीक्षार्थी अनुपस्थित होते. या परीक्षेसाठी विशेष पथकासह भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली होती. केंद्र परिसरात जॅमर बसविण्यात आले होते. परीक्षा केंद्रांभोवती कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. परीक्षा केंद्रांच्या परिसरात अनधिकृत व्यक्ती, वाहनांची वर्दळ तसेच गोंगाट होऊ नये यासाठी खबरदारी घेण्यात आल्याचे दिसून आले. परीक्षा केंद्रांवर विशेष पथकात जीएसटी विशेष निरीक्षक किशोर चौरे तर भरारी पथक प्रमुख प्रांताधिकारी अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी आर्दीच्या पथकांनी भेटी देत आढावा घेतला.

# आयुक्तांच्या उपस्थितीत पार पडली व्यापाऱ्यांची बैठक

प्रतिनिधी । धुळे

**महापालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने शहरातील मतदानाची टक्केवारी वाढावी व जनजागृती व्हावी यासाठी शहरातील व्यापारी संस्था प्रमुखांची बैठक आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी नितीन कापडणीस यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.**

बैठकीला प्रशांत पवार, व्यापारी संस्थांचे प्रतिनिधी, उपायुक्त मनोज वाघ, वसुली अधिक्षक मुकेश अग्रवाल, शिक्षण मंडळ समन्वयक गणेश सुर्यवंशी यांच्यासह शहरातील व्यापारी व व्यापारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# सार्वजनिक मराठी हायस्कूलच्या ५ शिक्षकांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी । नवापूर

**महाराष्ट्र शासनाच्या एससीईआरटी विभागातर्फे शिक्षक व अधिकारी यांच्यासाठी आयोजित स्पर्धेसाठी श्रीमती प्र.अ. सोढा सार्वजनिक मराठी हायस्कूल व हाजी ए.एम. व्होरा कनिष्ठ महाविद्यालयातील पाच शिक्षकांची राज्यस्तरावर निवड करण्यात आली आहे.**



निवड झालेल्यामध्ये उपमुख्याध्यापक नारायण मराठे (सुगम संगीत स्पर्धा), गणेश महाजन (पर्यवेक्षक, योगासन स्पर्धा), विशाल शिंदे (एनिमेशन स्पर्धा), मनोज पाटील (अभिनय स्पर्धा), कविता खैरनार (शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा) यांचा समावेश असून त्यांच्या या निवडीबद्दल नवापूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विपीनभाई चोखवाला, कार्याध्यक्षा शीतल वाणी, उपाध्यक्ष शिरीष शाह, सचिव राजेंद्र अग्रवाल, सहसचिव सोयेब मांदा, कोषाध्यक्ष सतीश शाह, मुख्याध्यापक मिलिंद वाघ आदींनी अभिनंदन केले आहे.

# अभ्यास, जिद्द व चिकाटी या त्रिसूत्रीचा वापर करून ध्येयापर्यंत पोहचता येते

## आ.राम भदाणे यांचे प्रतिपादन; रासेयोच्या हिवाळी शिबिराचे उद्घाटन

प्रतिनिधी । धुळे

**तरुणांनी स्वत: मधील सुप्त गुण ओळखले पाहिजेत. त्या अनुषंगाने ध्येय निश्चित केले पाहिजे. अभ्यास, जिद्द व चिकाटी या त्रिसूत्रीचा वापर करून ध्येयापर्यंत पोहचता येते, असे प्रतिपादन आ.राम भदाणे यांनी केले.**



धुळे तालुक्यातील सायने येथे नगाव येथील गंगामाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराचे उद्घाटन आ.भदाणे यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.आर. पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून राजेंद्र पाटील, पोपट माळी, भटू पाटील, छोटू कोळी, डॉ.एस.के. शेलार, समाधान पाटील, वसंत माळी, गणेश पाटील, भूषण पाटील, माधवराव पाटील, नंदलाल सांगळे, दिलीप पाटील, रमेश पाटील, नानाभाऊ पाटील, निवृत्त मुख्याध्यापक व्ही.यू. पाटील, सुनील पाटील, हर्षल जाधव, विठ्ठल माळी, अशोक पाटील, चिंतामण जाधव, संदीप पाटील, विकास पाटील, शांताराम पाटील, रवींद्र पाटील, योगेश पाटील, कैलास पाटील, रोहीदास पाटील, विश्वास पाटील, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

आ.भदाणे पुढे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून पुढे जाण्याची उर्मी निर्माण होते. या शिबीरांच्या माध्यमातून असंख्य युवक घडलेले आहेत. शिबीरातून स्वत:मध्ये बदल घडविण्याचा मुलमंत्र मिळतो. यातून श्रमप्रतिष्ठा, शिस्त, जिद्द, अभ्यास, आदर, न्याय, शौर्य, समाजसेवा आदींची जडणघडण होत असते. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाला महाविद्यालयीन जिवनापासूनच सुरूवात केली पाहिजे, असे ते यावेळी म्हणाले

### ➤ पडीत जमीन विकासासाठी प्रयत्न करावा : प्राचार्य पाटील

यावेळी प्राचार्य डॉ.एस.आर. पाटील यांनी देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शाश्वत विकासात युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यासाठी युवकांनी प्रयत्न करावा. पर्यावरणाचे रक्षण, पाणलोट व्यवस्थापन व पडीत जमिन विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# हमीभाव मका खरेदी केंद्राचे उद्घाटन

प्रतिनिधी । धुळे

तालुक्यातील धमाणे फाट्याजवळील धोडी शिवारात मका हमी भाव खरेदी केंद्राचे उद्घाटन जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांच्या हस्ते करण्यात आले.

तालुक्यातील शेतकऱ्यांची सोय व्हावी. यासाठीच या केंद्रास मंजूरी आणली आहे. शेतकऱ्यांनी या केंद्राचा लाभ घेण्याचे आवाहन श्री. भदाणे यांनी यावेळी केले. याप्रसंगी पंचायत समितीचे माजी उपभापती सखाराम पाटील, नानू सुर्यवंशी, भूषण पाटील, जयेश पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्या एकास गुन्हे शाखेकडून अटक

## मुक्ताईनगर परिसरात धडक कारवाई; १० लाख १९ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात अवैध गुटखा वाहतूक व विक्रीचे प्रमाण वाढल्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहितीच्या आधारे कारवाईचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्या इसमास अटक करून सुमारे १० लाख १९ हजार २० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.**



स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी एर्टिगा (क्र. एमएच ४६ बी १०६५) या वाहनातून मुक्ताईनगर मार्गे बऱ्हाणपूर (म.प्र.) ते छत्रपती संभाजीनगर या दिशेने अवैध गुटख्याची वाहतूक होणार आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा व मुक्ताईनगर पोलीस ठाण्याचे संयुक्त पथक पुरनाड फाटा येथे सापळा रचून थांबले. दरम्यान संशयित वाहन भरधाव वेगात येताना दिसताच पोलिसांनी थांबविण्याचा प्रयत्न केला; मात्र चालक वाहन घेऊन खामखेडा गावाच्या दिशेने पळून गेला. पोलिस पथकाने पाठलाग करून संबंधित वाहन थांबवले. तपासणीदरम्यान वाहनात मोठ्या प्रमाणात अवैध गुटखा आढळून आला.

वाहन चालकाचे नाव अरबाज नौशाद बेग (वय ३०), रा. काझी हाऊस, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या ताब्यातून रजनीगंधा सुगंधित पानमसाला, करमचंद प्रीमियम पानमसाला, मिराज तंबाखू, विमल पानमसाला, पानपराग पानमसाला, जाफराणी जर्दा, तसेच संबंधित वाहन व मोबाईल फोन असा एकूण १० लाख १९ हजार ०२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत स्थानिक गुन्हे शाखा व मुक्ताईनगर पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार सहभागी होते.

# न. ह. रांका विद्यालयात ज्ञानवर्धिनी प्रज्ञाशोध प्रश्नमंजूषा व बक्षीस वितरण

प्रतिनिधी । बोदवड

**नुकतेच बोदवड येथील न.ह. रांका विद्यालयात बोदवड एज्युकेशन सोसायटी बोदवडचे चेअरमन मिठूलाल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली ज्ञानवर्धिनी प्रज्ञाशोध प्रश्नमंजुषा व बक्षीस वितरण कार्यक्रम झाला.**

यावेळी प्रमुख अतिथी चॅलेंज फाउंडेशन जळगाव संचालक प्रा.किरण माळी तसेच संस्थेचे उपाध्यक्ष अजय जैन, सचिव विकास कोटेचा, माजी चेअरमन व ज्येष्ठ संचालक अ‍ॅड. प्रकाशचंद सुराणा, अशोक जैन, आनंद जैस्वाल, रवींद्र माटे, विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.एम.पाटील, उपमुख्याध्यापिका मीनाताई बडगुजर, उपप्राचार्य एम.टी. नेमाडे, पर्यवेक्षक आर. के. तायडे, जे.एन. माळी, बक्षीस पात्र विद्यार्थी तथा त्यांचे पालक, विद्यार्थी-विद्यार्थिनी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर श्रीमती व्ही.आर. पाटील यांनी बसविलेले स्वागत नृत्य विद्यार्थिनींनी सादर केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक तथा अध्यक्षीय सूचना प्रा. किरण उबाळे यांनी तर अनुमोदन प्रा.एच. एल. पाटील यांनी दिले. अतिथींचा परिचय दीपक चौधरी यांनी केला. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष, अतिथी तथा मान्यवरांच्या स्वागत समारंभ पार पडला. स्पर्धाप्रमुख जे.एन. पाटील यांनी ज्ञानवर्धिनी प्रज्ञाशोध परीक्षाविषयी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात विद्यालयातील उपशिक्षक डॉ.विश्वजीत सिसोदे यांच्या 'देवराई-एक सचित्र वनगाथा' या पुस्तकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे माजी चेअरमन अ‍ॅड. प्रकाशचंद सुराणा यांनी मनोगतात ज्ञानवर्धिनी कार्यक्रम आमच्या शाळेचा डी.एन.ए. आहे. ज्ञानवर्धिनी म्हणजे विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांची तयारी व्हावी, ज्ञानात भर पडावी व वेगवेगळ्या विषयांची माहिती व्हावी, यासाठी शाळेने हा कार्यक्रम सुरु केला आहे. प्रमुख अतिथी किरण माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत इ. ५ वी ते १० वीच्या अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रित केल्यास स्पर्धा परीक्षेत यश मिळवता येते, असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात मिठुलाल अग्रवाल म्हणाले, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक जीवनात चुका दुरुस्त करुन पुढील वाटचाल करावी व यश संपादन करावे. कार्यक्रमाच्या शेवटी न.ह. रांका हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी बापाचे महत्त्व सांगणारे थीम गीत सादर केले. कार्यक्रमाची सांगता अमोल नाईक यांनी म्हटलेल्या वंदेमातरम्ने झाली. सूत्रसंचलन डॉ. विश्वजीत सिसोदे यांनी तर आभार प्रा.जीवन राऊळ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानवर्धिनी स्पर्धाप्रमुख प्रा. जे. एन. पाटील उपप्रमुख एच. आय. परदेशी तसेच विविध समित्यांचे सहकार्य लाभले.

- प्रश्नमंजुषा फेऱ्यांच्या माध्यमातून पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या गटातून क्रमांक पटकावलेले कुश घाटे, कु. भाविका पाटील, कु. वैष्णवी भोई व उत्तेजनार्थ केदार माळी, श्रीरंग पिहल, स्पंदन पाटील, कु. कनक पाटील व उत्तेजनार्थ लोकेश पाटील, रुपेश महाजन, सार्थक मराठे, लावण्य पाटील व उत्तेजनार्थ कु. कोमल डिके, प्रणाली मुन्हे, सुशांत वांगेकर, गौरी बोरे व उत्तेजनार्थ कु. रोहिणी खवळे या चिनी सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रशस्तीपत्र, प्रेरणादायी पुस्तक व रोख रक्कम बक्षीस म्हणून मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

## थोडक्यात

### अमळनेरात आज पत्रकार दिन सोहळ्याचे आयोजन

**अमळनेर ।** आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकारदिन सोहळ्याचे आयोजन उद्या दि. ६ जानेवारी रोजी पत्रकार भुवन (योगा भुवन) अन्नपूर्णा मंगल कार्यालयाजवळ येथे सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. शहर व तालुका पत्रकार संघटना, व्हॉइस ऑफ मीडिया आणि महाराष्ट्र पत्रकार संघटना आदी अमळनेर शहर व तालुक्यातील सर्व पत्रकार संघटनांच्या वतीने हा सोहळा होणार आहे. यावेळी तालुक्यातील लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### नीलिमा भोळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार

**यावल ।** येथील शारदा माध्यमिक विद्यालयातील उपशिक्षिका श्रीमती नीलिमा गोविंदा भोळे यांना शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगरच्या १६ व्या वर्धापनदिनानिमित्त तापी-पूर्णा राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार नुकताच शाल /पुष्पगुच्छ /प्रमाणपत्र आणि मानचिन्ह श्री. पाटील व फाउंडेशनच्या जिल्हा सचिव प्रविण वारके यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

# ज्येष्ठ नागरिक संघ म्हणजे चालते-बोलते विद्यापीठ : ना. संजय सावकारे

प्रतिनिधी । भुसावळ

ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे चालते-बोलते विद्यापीठ असून त्यांच्या अनुभवातून, संघर्षातून आणि जीवनमूल्यांतून नवी पिढी घडते, असे भावनिक व प्रेरणादायी प्रतिपादन वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी केले.

कुन्हे पानाचे येथे रेणुकामाता ज्येष्ठ नागरिक संघाच्या १० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंत्री सावकारे यांनी ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहाच्या जिना परिसरात सेविंग ब्लॉक व संरक्षण भिंत उभारण्यासाठी आमदार निधीतून पाच लाख रुपयांचा निधी मंजूर करण्याची जाहीर घोषणा केली. समाज सुदृढ ठेवायचा असेल तर ज्येष्ठांचा सन्मान, त्यांचे आरोग्य आणि सामाजिक सहभाग जपणे अत्यंत आवश्यक आहे. ज्येष्ठांचे आशीर्वाद व मार्गदर्शन हीच आमच्या कार्याची खरी ऊर्जा आहे, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंत्री संजय सावकारे होते. माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वनाथ पाटील व समाधान पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. फेस्कामचे जळगाव जिल्हा पूर्व विभाग समन्वयक विसपुते तसेच माजी केंद्र प्रमुख जावळे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांनी संघटित राहणे ही काळाची गरज असून फ ेस्कामच्या माध्यमातून विविध सवलती, सुविधा व हक्क मिळत आहेत. संघटनेमुळे ज्येष्ठांचा आत्मसन्मान व सुरक्षितता वाढते. यावेळी सर्व ज्येष्ठ सदस्यांना भाग्योदय कॅलेंडरचे वितरण मंत्री संजय सावकारे व माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

# 'डीआरओ' अंतर्गत जिल्ह्यातील २४ पाणलोट गावांतील आठ प्रशिक्षण तुकड्या यशस्वी

प्रतिनिधी । अमळनेर

**न्यू जनरेशन पाणलोट विकास प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या अंतर्गत अमळनेर तालुक्यातील ९ गावात पारोळा तालुक्यातील ९ गावात व पाचोरा तालुक्यातील ६ गावात असे एकूण जिल्ह्यात २४ गावात पाणलोट विकास प्रकल्प सुरु आहे.**

यामध्ये क्षमता बांधणी घटकांतर्गत जिल्हा संसाधन संस्था (डिआरओ) सदर प्रशिक्षण संस्था म्हणून राष्ट्रविकास अ‍ॅग्रो एज्युकेशन संस्था अमळनेर जि. जळगाव या संस्थेची निवड झाली आहे. त्यामध्ये वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा महाराष्ट्र राज्य पुणे व जलसंधारण विभाग जळगाव यांच्या सहकार्यातून सदर प्रशिक्षण घेण्यात येत आहे.

**यामध्ये जल व भूमी व्यवस्थापन संस्था छ. संभाजीनगर यांनी संस्थेचे प्रविण प्रशिक्षक तयार केलेले असुन त्या प्रविण प्रशिक्षण कार्यक्रम सुस्वागतम् प्रशिक्षक मार्फत जे गावे पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प अंतर्गत आहे त्यांना सदर प्रशिक्षण देण्यात येत आहे.**

सदर प्रशिक्षण जिल्ह्यातील एकूण २४ गावातील सचिव, सरपंच, शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, पाणलोट पथक सदस्य, प्रकल्प प्रशिक्षण संस्थेचे प्रविण प्रशिक्षक, पीआयए, जिल्हा लेखापाल तसेच पाणलोट गावातील ग्रामसेवक यांना सदर प्रशिक्षण देण्यात आले यामध्ये पाणलोट क्षेत्र ओळख प्रशिक्षण, सविस्तर प्रकल्प आराखडा, लेखा बाबी प्रशिक्षण, बहिगमन प्रशिक्षण, पाणलोट सचिव प्रशिक्षण, पाणी नियोजन व पिक पध्दत, शेतकरी उत्पादक संघ प्रशिक्षण, एनजीओ मॅनेजमेंट व गव्हर्नमेंट स्कीम कन्वर्जन प्रशिक्षण, इत्यादी विषयांवर सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक बी.एस. ढंगार, जिल्हा समन्वयक पुरुषोत्तम पाटील, पीआयए व पाणलोट पथक सदस्य अमळनेर, पाचोरा, पारोळा यांच्याकडुन सहकार्य मिळाले.

# ७० वर्षांच्या वृध्दाला प्रथमच मिळाला ओळखीचा अधिकार

## आ.अमोल जावळे यांच्या मार्गदर्शनातून 'शासन आपल्या दारी' शिबिरात माणुसकीचे दर्शन

प्रतिनिधी । रावेर

**आ. अमोल जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंजलवाडी (ता. रावेर) येथे आयोजित शासन आपल्या दारी तक्रार निवारण शिबिरात एक अत्यंत हृदयस्पर्शी व सामाजिक वास्तव अधोरेखित करणारी घटना समोर आली.**



या शिबिरात गावातील अर्जुन सखाराम पिसाळ हे ७० वर्षांचे वृद्ध नागरिक, ज्यांच्याकडे आजतागायत ना आधार कार्ड होते, ना मतदान ओळखपत्र, अशी धक्कादायक बाब उघडकीस आली. आयुष्याची सात दशके उलटूनही एका नागरिकाची शासकीय यंत्रणेत कुठेही नोंद नसणे, ही बाब उपस्थित सर्वांसाठी अंतर्मुख करणारी ठरली. मी या देशाचा नागरिक आहे, पण माझी कुठेच नोंद नाही हे शब्द सांगताना त्या वृद्धाच्या डोळ्यांत अश्रू होते. स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे उलटूनही मूलभूत ओळखीपासून वंचित राहावे लागणे, हे सुशासनासाठी मोठे आव्हान असल्याचे यावेळी जाणवले. ही बाब शिबिरात समोर येताच, आ.अमोल जावळे यांच्या सूचनेनुसार तात्काळ तहसीलदार दीपा जेधे, नायब तहसीलदार संजय तायडे यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल अधिकारी व बीएलओ यांनी तत्काळ कार्यवाही सुरू केली. तसेच ग्रामविकास अधिकारी संजय महाजन यांनी सरपंच वैशाली हिवराळे यांच्याशी समन्वय साधून संबंधित वृद्ध नागरिकांना रहिवासी दाखला तातडीने उपलब्ध करून दिला. या घटनेतून शासन केवळ कागदोपत्री व्यवस्था नसून, सामान्य माणसाच्या अडचणींवर तत्काळ उपाय करणारी संवेदनशील यंत्रणा असल्याचे स्पष्ट झाले. या सर्व प्रक्रियेमुळे त्या वृद्ध नागरिकाला आयुष्यात प्रथमच अधिकृत ओळखीचा अधिकार मिळण्याचा मार्ग खुला झाला.

# अशोक लाडवंजारी यांना कॉर्नर सभांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । जळगाव

**राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) व उद्धवसेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे अधिकृत उमेदवार अशोक सीताराम लाडवंजारी हे प्रभाग क्रमांक १४ 'अ' मधून निवडणुकीच्या रिंगणात आहे. कॉर्नर सभेच्या माध्यमातून ते नागरिकांशी संवाद साधत परिसरातील समस्या जाणून घेत आहेत. दि. ४ जानेवारी रोजी सायंकाळी त्यांनी तांबापुरा येथील मच्छी बाजार, डी-मार्ट समोरील परिसर याठिकाणी कॉर्नर सभा घेतली. यावेळी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**



खाटीक महाराष्ट्र झोनल अध्यक्ष रईस खाटीक यांच्यासह परिसरातील नागरिकांशी चर्चा करून त्यांनी प्रभागातील समस्या जाणून घेतल्या. तांबापुरा परिसरातील इब्राहिम मशीद जवळील भागातदेखील कॉर्नर सभा घेण्यात आली. यावेळी उमेदवार अशोक लाडवंजारी, राष्ट्रवादी कॉंग्रेस महानगराध्यक्ष एजाज मलिक, काजी सर,जमील शेख यांच्यासह प्रभाग क्रमांक १४ मधील उमेदवार उपस्थित होते.

उमेदवार अशोक लाडवंजारी यांनी या प्रभागातील समस्या जाणून घेत निवडून आल्यानंतर या भागाचा कायापालट करण्याचा संकल्प करीत उपस्थित नागरिकांना आश्वसित केले. रात्री बे रात्री होणारा पाणीपुरवठा, परिसरातील स्वच्छता यांसह ओपन प्लेसमध्ये तरुणांसाठी हॉल तयार करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी तरुणांनी टाळ्यांच्या गजरात अशोक लाडवंजारी यांचे स्वागत केले.

अशोक लाडवंजारी म्हणाले की, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्त्वानुसार पक्षाचे धोरण आहे. आपल्या परिसरातील जनतेची सेवा करण्याचा मनोदय असल्याने उमेदवारी करीत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मागील पंचवार्षिक निवडणुकीत निवडून आलेले उमेदवार महापौर तथा विरोधी पक्षनेते राहून चुकले, मात्र त्यांनी नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्याऐवजी स्वतःचा स्वार्थ साधला. त्यामुळे त्यांच्या आश्वासनांना बळी न पडता योग्य उमेदवाराला साथ द्या आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे चारही उमेदवारांना विजयी करा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

### कायम आपल्यासोबत...

या कॉर्नर सभेत नागरिकांच्या समस्या जाणून घेत, अशोक लाडवंजारी म्हणाले की, मी निवडणूक जिंकलो तरी आपल्यासोबत आणि हरलो तरी आपल्यासोबत काम करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी महानगर अध्यक्ष एजाज मलिक, काझी सर यांच्यासह मान्यवरांची भाषणे झाली. एजाज मलिक म्हणाले की, या परिसरातील विकास साधण्यासाठी सर्वांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारांना निवडून देऊन एक वेळेस संधी द्यावी, या परिसरात युनिक उर्दू प्री-प्रायमरी स्कूल तांबापुरा येथे सातवीपर्यंत शाळा असली तरी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी दहावीपर्यंत शाळा व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करीत चांगल्या व्यक्तींना निवडून द्या, असे आवाहन त्यांनी केले.

### कंजरवाडा भागातही पार पडली कॉर्नर सभा

त्यानंतर तांबापूर परिसरातील कंजरवाडा भागात कॉर्नर सभा पार पडली. यावेळी नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या. यात प्रामुख्याने पाणी, लाईट, गटारी, शौच्छालय, रस्त्याच्या दुरवस्थेची व्यथा नागरिकांनी मांडली. नागरिकांच्या समस्या ऐकून घेत, या समस्या सोडवण्याचे आश्वासन अशोक लाडवंजारी यांनी दिले. तसेच गरजू नागरिकांना घरकुल योजना राबविण्याचे देखील आश्वासन त्यांनी दिले. यावेळी मकबुल तडवी, जमीलद्दीन शेख, रियाज काकर, असिफ खाटीक, नईम खाटीक, फारुख पिंजारी, इरफान खान, हमीद पिंजारी, सुलतान शेख, नाझीर खाटीक, अनमोल गुमाने यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मान्यवरांच्या उपस्थितीत आज प्रचाराचा शुभारंभ**

महापालिका निवडणुकीसाठी दि. ६ जानेवारी रोजी सकाळी ८ : ३० वा. इच्छादेवी माता चौक येथे प्रचार नारळ फोडून शुभारंभ करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे आमदार एकनाथराव खडसे , माजी आमदार संतोष चौधरी , शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, महानगर जिल्हाध्यक्ष एजाजभाई मलिक, श्रीराम मंदिर मेहरुण व लाडवंजारी समाज अध्यक्ष चंद्रकांत लाडवंजारी, प्रभाग क्रमांक १४ चे अधिकृत उमेदवार अ) लाडवंजारी अशोक सिताराम, ब) तडवी नाजमीन मकबुल, क) सना शेख रियाज, ड) जमिलोद्दीन शेख शारिफुद्दीन शेख यांची प्रचार रॅली काढण्यात येणार आहे. इच्छादेवी, फुकटपुरा चौक, शहीद अब्दुल हमीद चौक, टिपू सुलतान चौक, बिलाल चौक, महादेव मंदिर चौक, जुम्मा शाह वखार, मच्छी बाजार चौक, शिरसोली नाका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे समारोप, शहीद अब्दुल हमीद चौक, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अशोक लाडवंजारी, नाजमीन तडवी, रियाज सना, शेख जमिलोद्दीन, प्रमुख पदाधिकारी अकिल खान, मुस्तफा मिर्झा, फिरोज खान, नईम खाटीक, रफीक शाह, कलुभाई खाटीक, रईसभाई खाटीक, इसाभाई शेख, मुखत्तारभाई शेख, अय्युब बागवान, नदिमभाई शेख, अश्फाक खाटीक, लालाभाई खाटीक, फारुक पिंजारी, रितेश लाडवंजारी आदींनी केले आहे.

# पत्रकारदिनानिमित्त सावदा येथे आज मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी । सावदा

**दि.६ जानेवारी मंगळवार रोजी पत्रकार दिना निमित्त ओरिजिनल पत्रकार संघ सावदा, व गोदावरी फाऊंडेशन जळगाव यांच्या वतीने भव्य मोफत आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया सल्ला शिबिर रावेर तालुक्यातील सावदा येथे आयोजित करण्यात आले आहे.**

ओरिजिनल पत्रकार संघ सावदा व गोदावरी फाऊंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यामाने हे भव्य आरोग्य शिबिर मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ मंगळवार रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत, जेहरा मॅरेज हॉल, रावेर रोड, सावदा येथे आयोजित करण्यात आले असून, तज्ज्ञ वैद्यकीय पथकाद्वारे तपासणी, सल्ला आणि आवश्यक उपचार उपलब्ध करून देण्यात येतील.

सावदा येथील ओरिजिनल पत्रकार संघाचे हे प्रयत्न ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा घराजवळ उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

सर्व नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक ओरिजनल पत्रकार संघाचे अध्यक्ष भानुदास भारंबे, उपाध्यक्ष दिलीप चांदेलकर, सचिव शेख फरीद, कार्याध्यक्ष युसुफ शहा, कैलास लवंगडे, प्रसिद्धी प्रमुख अजहर खान, दीपक श्रावगे, शेख मुखतार, प्रशांत सरवदे, अकरम खान यांनी केले आहे. सदर शिबिरास नगरसेवक, अधिकारी, स्थानिक पत्रकार यांचे सह रावेर यावल तालुक्यातील पत्रकार उपस्थित राहणार आहेत- दि. ६ जानेवारी मंगळवार रोजी पत्रकार दिना निमित्त ओरिजिनल पत्रकार संघ सावदा, व गोदावरी फाऊंडेशन जळगाव यांच्या वतीने भव्य मोफत आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया सल्ला शिबिर सावदा येथे आयोजित करण्यात आले आहे.

**शस्त्रक्रियांचे प्रकार – स्वादुपिंड (पॅनक्रियास) संबंधित शस्त्रक्रिया, छोट्या गाठी (ट्यूमर/सिस्ट) काढणे, मुळव्याध (पाइल्स), हायड्रोसिल, अंडाशय शस्त्रक्रिया, भांड (हर्निया) पित्ताशयाचे खडे (गॉलस्टोन), पायातील शिरा फुटणे (व्हेरिकोज व्हेन्स), मुत्रपिंडाचे आजार, पोट व आतड्यांच्या शस्त्रक्रिया आदी.**

**शिबिरात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत मोफत उपचारांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे...रेशन कार्ड (पिवळे/केसरी/अन्नपूर्णा/अंत्योदय इ.), आधार कार्ड, ३.आयुष्यमान कार्ड (आयुष्यमान भारत कार्ड) तयार असल्यास त्याची प्रत.**